# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राबविण्यात येत असलेली 'संविधान दूत' ह्या महत्वकांक्षी योजनेचे परिपत्रक यापुर्वी ११ सप्टेंबर, २०१८ रोजी संलग्न महाविद्यालयांना शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून तसेच सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना ई-मेलवरून पाठविण्यात आलेले आहे. तथापि, अद्यापही बऱ्याच महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयात संविधान दूत नियुक्त केलेल्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे पत्र शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राकडे पाठविल्याचे दिसून येत नाही. सबब, याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात निवडलेले 'संविधान दूत' यांचे अर्ज तात्काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे अग्रेशित करावेत.

आदेशान्वये
19/11
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/180
दिनांक- 20 NOV 2018

# संविधानदूत योजनेचा प्रस्ताव
## ( शिवाजी विद्यापीठाचा महत्वाकांक्षी प्रकल्प )

**प्रस्तावक:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**योजनेचे क्षेत्र:**

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र

**प्रस्तावना:**

विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक सक्षम व प्रगल्भ व्हावेत आणि विद्यापीठाचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचावे हे विद्यापीठाने आपले कर्तव्य समजले आहे. त्याअनुषंगाने स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी उदात्त मानवीमूल्ये रूजविण्यासाठी आणि समाजामध्ये भारतीय संविधानाबद्दल जागृती करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे हे केंद्र 'संविधानदूत' हि महत्वकांक्षी योजना राबवित आहे.

**प्रकल्पाची उध्दीष्टे :**

१) भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करणे. विद्यार्थी व शिक्षकांनी ती जागृती समाजामध्ये करणे.

२) मानवी हक्क व मानवी मूल्यांप्रती जागृती निर्माण करणे.

३) स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी उदात्त मानवीमूल्ये रूजविण्यासाठी प्रयत्न करणे.

**कार्यवाही :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी सदर केंद्राचे महाविद्यालयातील प्रतिनिधी म्हणून 'संविधानदूत' कार्य करतील.

२) संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य महाविद्यालयातील किमान एका शिक्षकाची 'संविधानदूत' म्हणून निवड करतील व त्याचे नाव विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राला कळवतील. सर्व महाविद्यालयामध्ये प्रत्येकी किमान एक 'संविधानदूत' कार्यरत असेल.

३) सदर केंद्र राबविणार असलेल्या उपक्रमांचा व संविधानाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य हे 'संविधानदूत' करतील.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व संलग्न महाविद्यालय एकत्र येऊन या केंद्राच्या उद्दिष्ठानूसार जागृती कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयात किंवा केंद्रात करतील. या कार्यक्रमांमध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग इत्यादींचा समावेश असेल. यासाठी संविधानदूत दुवा म्हणून कार्य करेल.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व संलग्न महाविद्यालय एकत्र येऊन या केंद्राच्या उध्दीष्ठानुसार संशोधन कार्य हाती घेतले जाईल. त्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, व इतर समाज घटक आवश्यकतेप्रमाणे सहभागी होतील. यासाठी संविधानदूत दुवा म्हणून कार्य करले.

## (Advisory Committee 14 September 2017 )

5. The Committee approved to the scheme 'Savidhandut' to be implemented in the jurisdiction of Shivaji University (The details of the scheme are enclosed herewith in Annexure) from 2017- 2018.

## (Advisory Committee 29 June 2018 )

8. The committee already approved the 'Sanvidhandut' Scheme in its earlier meeting. In this meeting the committee decided to submit separate proposal of 'Sanvidhandut' Scheme to be implemented in the jurisdiction of Shivaji University. The committee resolved that the information of 'Sanvidhandut Scheme' should be put on the university website and applications would be invited from college teachers who want to be 'Sanvidhandut'.